CNR No.MHSI01000723-2024

## निशाणी ९० खालील आदेश

अर्जदार यांनी सामनेवाले नं. ३५, सामनेवाले नं. ३७ व सामनेवाले नं. ३८ यांचे कायदेशीर वारसांची दुरुस्ती करणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार व सामनेवाला यांच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले.

२. अर्जदार यांचे अर्जामध्ये कथन की, सामनेवाले नं. ३५ शिवराम नारायण घोडगेकर, सामनेवाले नं. ३७ मंदाकिनी नारायण घोडगेकर व सामनेवाले नं. ३८ भिमा नारायण घोडगेकर हे निशाणी ४८ व ५१ दि. २१/१०/२०२४ रोजीचे रजिस्टर्ड पोस्टाचे अहवालाप्रमाणे मयत असल्याबाबत समजले. अर्जदार यांनी सामनेवाला यांचे वारसाबाबत माहिती प्राप्त करुन घेतली, परंतु मयत सामनेवाला यांचे मृत्यू दाखला व मृत्यु तारखेबाबत माहिती उपलब्ध होऊ शकली नाही. अर्जदार यांना सदर सामनेवाला मयत असलेबाबत नोटीस बजावणी अहवालाने समजले. सामनेवाला नं. ३५ यांना ३५अ, ३५ब, ३५क, व ३५ड, सामनेवाला नं. ३७ यांना ३७अ, ३७ब व ३७क तसेच सामनेवाला नं. ३८ यांना ३८अ, ३८ब व ३८क असे कायदेशीर वारस आहेत. सदर वारसांची अर्जाकामी दुरुस्ती होणे न्यायोचित असून तसे न झाल्यास अर्जदार यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागणारे आहे. सबब, वारसांची दुरुस्ती निशाणी १ कामी करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

३. सामनेवाले यांनी अर्जावर म्हणणे देऊन तीव्र विरोध केलेला आहे.

४. अर्जदार यांच्या अर्ज व त्यावरील सामनेवाले यांचे म्हणणे याचा विचार करता अर्जदार यांनी सामनेवाले नं. ३५, सामनेवाले नं. ३७ व सामनेवाले नं. ३८ यांचे वारस अपिलामध्ये समाविष्ट करणेसाठी अर्ज दाखल केला आहे. सामनेवाले नं. ३५, सामनेवाले नं. ३७ व सामनेवाले नं. ३८ यांचे वारस अपिलाकामी आवश्यक पक्षकार आहेत. त्यामुळे अपिलाचा अंतिम गुणदोषावर निकाल होण्यासाठी अपेलंट यांना संधी देणे योग्य व न्यायाचे होणारे आहे. त्यामुळे अर्जदार याने दिलेले कारण योग्य व संयुक्तिक असल्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार यांचा निशाणी ९० वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार यांना आदेशीत करण्यात येते की, सामनेवाले नं. ३५, सामनेवाले नं. ३७ व सामनेवाले नं. ३८ चे वारस अर्जामध्ये १४ दिवसांच्या आत घेऊन अर्जामध्ये दुरूस्ती करावी व अपिलाची प्रत हजर करावी. तसे न केल्यास अर्ज हा आपोआप रद्द समजण्यात येईल.

SURYAKANT SHANKARRAO INDALKAR

Digitally signed by SURYAKANT SHANKARRAO INDALKAR
Date: 2026.04.16 17:50:21 +0530

सिंधुदुर्ग – ओरोस
दिनांक : १६/०४/२०२६

(एस्. एस्. इंदलकर)
तदर्थ जिल्हा न्यायाधीश–१ व
अतिरिक्त सत्र न्यायाधीश,
सिंधुदुर्ग–ओरोस.